१४ व्या आणि १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत
प्राप्त निधीच्या खर्चाच्या मुदतवाढीबाबत.

# महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक-कोरोना-२०२१/प्रक्र-५५ /वित्त-४
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
दिनांक - १० जून, २०२१

संदर्भ -१.संयुक्त सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे
क्र. N-11011/9/2016-FD, Date-3 April 2020 चे पत्र.
२. शासन परिपत्रक क्रमांक-चौविआ-२०२०/प्रक्र- १२४/वित्त-४
दि. ११ नोव्हे.२०२०
३. वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे
क्र. १५(१)FC-XV/FCD/२०२०-२५ Date-22.March 2021 चे पत्र
४. सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे
क्र. M-11015/141/2020-FD, Date-28 April 2021 चे पत्र.
५. पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे
क्र. M-11015/404/2020-FD, Date-27May 2021 चे पत्र .

## परिपत्रक

देशामध्ये कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढत असल्याकारणाने देशातील ग्रामीण भागांमध्ये कोरोना व्यवस्थापनाशी संबंधित विविध उपाययोजना राबविण्याबाबत संदर्भ क्र. ४ व ५ मधील पत्रान्वये केंद्र शासनाद्वारे राज्यास निर्देश प्राप्त झाले आहेत.

२. १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा पाच वर्षांचा कालावधी दिनांक ३१ मार्च २०२० रोजी संपुष्टात आला आहे. परंतु कोरोनाचे संकट उद्भवल्यामुळे या साथरोगाचा प्रसार रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. १ मधील पत्रानुसार १४ व्या केंद्रीय वित्त आयोगातर्गत प्राप्त निधीच्या खर्चाच्या मुदत वाढीबाबत राज्य शासनाद्वारे शासन परिपत्रक क्र. चौविआ-२०२०/प्रक्र- १२४/वित्त-४ दि. १० नोव्हेंबर, २०२० निर्गमित करण्यात आले आहे.

३. सद्यस्थितीमध्ये राज्यातील ग्रामीण भागांमधील नागरिकांना कोविड व्यवस्थापनांतर्गत स्वच्छता आणि आरोग्यासंबंधित विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे . सध्याची कोरोनाची विकट परिस्थिती विचारात घेता संदर्भ क्र. ३ मधील वित्त मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्राच्या अनुषंगाने १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा अखर्चित निधी दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत खर्च करण्यास या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

४. तसेच राज्यास १५ व्या केंद्रीय वित्त आयोगातर्गत आर्थिक वर्ष २०२० मधील बेसिक ग्रँट आणि टाईड ग्रँटचा दुसरा हप्ता अनुक्रमे जानेवारी- २०२१ आणि मार्च-२०२१ मध्ये प्राप्त झाला आहे. त्यामुळे १५ व्या केंद्रीय वित्त आयोगातर्गत प्राप्त निधीच्या खर्चाबाबत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या उर्वरित अल्पावधी लक्षात घेता सदर निधीचा खर्चही ३१ मार्च, २०२२ पर्यंत करण्याची परवानगी शासनस्तरावरून या आदेशान्वये देण्यात येत आहे.

५. १४ व्या आणि १५ व्या केंद्रीय वित्त आयोगातर्गत प्राप्त निधीच्या विनियोजनाबाबत वेळोवेळी शासन स्तरावरून निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांवर आधारित मूलभूत/पायाभूत सुविधा, स्वच्छतेसंबंधित बाबी तथा कोविड व्यवस्थापनाशी संबंधित उपाययोजना राबविण्याकरिता १४ व्या आणि १५ व्या केंद्रीय वित्त आयोगातर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्राप्त निधीचा वापर करण्यात यावा .

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२१०६०९१६५८३७१५२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रविण जैन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, कोकण/ नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,
उप सचिव ( पंचायत राज ) ग्रामविकास विभाग, मुंबई.
निवडनस्ती कार्यासन वित्त - ४

प्रत माहितीसाठी,

मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
मा.अतिरिक्त मुख्य सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहायक

Scanned with CamScanner